आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १४४ वा ● शुक्रवार दि. ०१ नोव्हेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## राजधानीत सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांना अभिवादन

नवी दिल्ली : देशाचे माजी उपप्रधानमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आणि देशाच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या स्मृतीदिनी त्यांना महाराष्ट्र सदनात अभिवादन करण्यात आले. यावेळी निवासी आयुक्त आणि प्रधान सचिव रुपिंदर सिंग यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली. कॉपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमास सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार, स्मिता शेलार आणि महाराष्ट्र सदनातील अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून आणि इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी 'राष्ट्रीय संकल्प दिवस' म्हणून पाळण्यात येते. यावेळी निवासी आयुक्त रुपिंदर सिंग यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना राष्ट्राची एकात्मता, अखंडता आणि सुरक्षा अबाधित राखण्याची शपथ दिली. याचप्रमाणे महाराष्ट्र परिचय केंद्रात देशाचे प्रथम गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल आणि पहिल्या महिला प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांना अभिवादन करण्यात आले.

## झरोका

एक – राजकीय पक्षाचे नेते सत्तेसाठी हापापलेले असतात. त्यांच्या भुलथापाना मतदार घायाळ होतात, आणि भाजपा सारखे जातीयवादी नेतृत्व मतदाराच्या माणगुडीवर बसते, त्यामूळे सत्ताकारणीयाना दोष न देता मतदारच भरकटलेले असावेत यात संदेह नसावा, पंरतू यातील गौडबंगाल काय असावे हे कळत नाही. डोकं भरकट्यासारखेच दिसते आहे.

दुसरा – अरे, राजकीय पक्षाचे नेते सत्तेसाठी वाटेल ते, कांहीही करीत असतात पंरतू मतदारांनी कोण खरा, कोण खोटा हे न पाहाता ऐनवेळी साम, दाम, दंड, भेद याला बळी पडून मतदार हा चुकीच्या मार्गाने जातो त्यामूळे चुकीचाच माणूस लोकप्रतिनिधी बनतो, आणि पाच वर्षे सत्ताधाराच्या विरोधात बोटं मोडीत बसण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. याच्यामुळे सर्वकांही घडत असते. त्यामूळे कोणाला दोष देवून काय फायदा हे लक्षात ठेव.

एक – अहो, सत्ताकारणाच्या निमित्तातून सत्ताधाऱ्यानी जी कांही दुकानदारी चालू केली आहे, ती राबवीत असताना सर्वसामान्य मतदार हा गुलाम बनलेला दिसतो. विविध योजना मधून मतदारांना कॅश बॅक दिला जातो त्यामूळे मतदार हे भावीक बनले असतील त्यातून सत्ताधाऱ्याना दोष का द्यावा अशी ही कुजबूज होत आहे, हे लक्षात घेताना मतदारांना दोष देणे चुकीचे वाटते.

दुसरा – अरे, सर्वसामान्य माणसा मधून लोकप्रतिनिधी निवडले जातात. स्थानिक पातळीवरील जे दलाल असतात त्यांच्या दुकान दारीतून हा पक्ष चांगला, तो वाईट हा उमेदवार योग्य, तो अयोग्य, अशी तुलना करुन टोलणाक्यातील शेल प्रमाणे मतदाराची किमंत केली जाते. त्याचा पर्दापाश प्रसार माध्यमे करीत नाहीत, त्यामूळे राजकीय पक्षाच्या नेते, कार्यकर्त्यांची चलती होते. याचा विचार कोण करणार हे तुझ्या लक्षात येत नाही काय.

एक – अहो, कालपरवा पासून विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने धर्मनिरपेक्षतेचा खडतर प्रवास होत असल्याच्या संदर्भात कोणा एका प्राध्यापीका राजेश्वरी देशपांडे यांनी खंत व्यक्त केलेली आहे, त्यामूळे राजकीय पक्ष हे फेरीवाले आहेत की काय, ही त्यांची शंका मनाला डागते म्हणून मतदार हे भरकटलेलेच आहेत काय अशी शंका व्यक्त केली असताना तूमचे काय बिघडते हेच कळत नाही, म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, तसं कांही नाही, राजकीय सारीपाटा मध्ये असे, तसे घडतच असते, धर्मनिरपेक्षता आणि पुरोगामीत्व हे चवीसाठी असते. हे लक्षात ठेव, म्हणजे झाले.

## विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने उमेदवारांची संपत्ती वाढली, ईडी करते काय ?




लातूर (दैलाप्रप्र) : विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने लोकप्रतिनिधीनी आपापल्या मतदार संघातील उमेदवारी अर्ज दाखल करताना स्वतः च्या मालमत्तेची नोंद केलेली आहे. त्यावरुन सर्वसामान्य जनतेचे डोके सटकल्या शिवाय राहाणार नाही, अशीच प्रस्थिती निर्माण झाल्याचे दिसते आहे. घोटाळेबाज अजित पवार, छगन भुजबळ, प्रताप सरनाईक, किंवा अशोक चव्हाण यांच्यासह जे कोणी भ्रष्टाचारी होते, ते क्लीनचीट झाले पंरतू गेल्या पाच वर्षा मध्ये त्याच्याकडे जी कांही संपत्ती होती ती दुप्पट कशी काय झाली, त्यांचे उद्योग धंदे कोणते आहेत, त्यांनी कुठे नांगर मारला, त्यांची जमीन, जायदास कोठे आहे, हा उल्लेख नसला तरी सत्तेच्या सावलीत राहून ही कोटीची उड्डाने कशी काय असावेत आणि याकडे ईडी चे दुर्लक्ष कसे काय असावे अशीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

लातूर विधानसभा मतदार संघातील साखर सम्राट अमित देशमूख यांची ही मालमत्ता दुप्पटीने वाढली. अशाच प्रकारे महाराष्ट्रातील सर्वपक्षीय विधानसभा निवडणूकीतील उमेदवारांची मालमत्ता पाच वर्षात घसघशीत वाढ झाली यात शिवसेना उध्दव ठाकरे, एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीचे शरद पवार, अजित पवार, कॉंग्रेसचे थोरात, चव्हाण, भाजपाच्या देवेंद्र फडणवीस यांच्यासह हरेक उमेदवारांची मालमत्ता दुप्टीने वाढलेली आहे. लोक महसुलातून राजकारण, सत्ताकारण करणाऱ्या लोकप्रतिनिधीना ही दाम दुप्पट संपत्ती कशी काय प्राप्त झाली या बाबतीत ईडी किंवा सीबीआय कशी काय अंधारात झोपलेली असावी, त्यांना उजेड प्रधान मंत्री नरेंद्र मोदी कसे काय देत नसावेत अशी शंका ही सर्वसामान्यातून व्यक्त होताना दिसते आहे.

खात नाही, खाऊ देत नाही, असे म्हणणाऱ्या प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांचा पारदर्शक कारभार कोणाच्या दावणीला बसलेला आहे, हे कळत नाही. त्यामूळे विधानसभा निवडणूकीच्या मतदाना पूर्वी सर्वपक्षीय उमेदवारांची उत्पादनात वाढ कशी काय झाली, कशा मुळे झाली, याची चौकशी करुन सर्वपक्षीय उमेदवारावर ईडी किंवा सीबीआय मार्फत कारवाई करावी अशीच मागणी सर्वसामान्य जनतेतून होताना दिसते आहे.

## निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांची एमसीएमसी, प्रसारमाध्यम कक्षाला भेट



लातूर : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती (एमसीएमसी) आणि प्रसारमाध्यम कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाला निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांनी भेट देवून कक्षाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

निवडणूक निरीक्षकांचे समन्वय अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी आप्पासाहेब चाटे, निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाचे प्रमुख तथा जिल्हा परिषदेचे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजेंद्र नागणे, प्रसारमाध्यम कक्षाचे नोडल अधिकारी तथा प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी तथा राज्यकर उपायुक्त ज्ञानोबा मुके यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि समाज माध्यमातून होणाऱ्या राजकीय जाहिरातींवर लक्ष ठेवून त्याबाबतचा खर्च उमेदवारांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यासाठी कळवावा, असे निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांनी सांगितले. श्री. घोलप यांनी कक्षाच्या कामकाजाबाबत माहिती दिली.

## लाडकी बहीण योजनेला विरोध करणाऱ्या काँग्रेसला महिलांनी मताद्वारे धडा शिकवावा–संजिवनीताई कराड



लातूर– महिलांना आणि मुलींना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे, त्या आत्मनिर्भर व्हाव्यात यासाठी राज्यातील महायुती शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला मात्र या निर्णया विरोधात काँग्रेसवाले न्यायालयात गेले. महिलांचे हिताची जपणूक करणाऱ्या योजनेला विरोध करणाऱ्या काँग्रेसला महिलांनीच आपल्या अमूल्य मतातून धडा शिकवावा आणि महायुतीला आशीर्वाद द्यावेत असे आवाहन भाजपाच्या सौ. संजीवनीताई रमेशअप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रचारार्थ पानगाव शहरासह रामवाडी, फावडेवाडी, मुसळेवाडी, नरवटवाडी येथे महिलांच्या गाठीभेटी आणि बैठका घेऊन सौ. संजीवनीताई कराड यांनी संपूर्ण परिसर ढवळून काढला. या प्रचार दौऱ्यात महिला मतदारांनी मोठा प्रतिसाद देत लाडका भाऊ रमेशआप्पा कराड यांनाच आमचा आशीर्वाद आणि आमचे मत असल्याची ग्वाही दिली.

प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या पानगाव येथील पुरातन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मनोभावे दर्शन घेऊन सौ. संजीवनीताई कराड यांनी भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रचाराला प्रारंभ केला. यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीचे दर्शन घेऊन भवानी मंदिर विश्र्वकर्मा मंदिरास भेट देऊन ललिता कांबळे, अर्चना वाटोळे, बालाजी कस्तुरे, समशेर पठाण, मारुती गालफाडे, जयश्री जाधव यांच्या निवासस्थानी बोलावलेल्या महिलांच्या बैठकीत त्याचबरोबर फावडेवाडी येथे दिनकर गीते, नरवटवाडी येथे सतीश आंबेकर मुसळेवाडी येथे दत्तात्रय जाधव आणि रामवाडी येथे आयोजित बैठकीस उपस्थित महिलांना आपल्या भागाच्या विकासासाठी आणि महिलांच्या हितासाठी महिलांचे सन्मान करणारे महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आले पाहिजे यासाठी आपल्या भागातून आ. रमेशआप्पा कराड यांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

महिलांना विविध योजनाचा लाभ देणाऱ्या लाडकी बहीण योजने अंतर्गत मदत करणाऱ्या महायुती शासनाच्या पाठीशी महिलांचे समर्थन असून महिला भजनी मंडळांना साहित्य आणि विविध योजनेचा लाभ मिळवून देणाऱ्या आ. रमेशआप्पा कराड यांनाच महिलांचे आशीर्वाद असल्याचे अनेक महिलांनी सौ. संजीवनीताई कराड यांना बोलून दाखविले. प्रत्येक ठिकाणच्या बैठकीस महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या प्रचार फेरी दौऱ्यात सतीश आंबेकर, सुकेश भंडारे अनंत चव्हाण, श्रीकृष्ण जाधव, अमर चव्हाण, गणेश तुरुप, श्रीकृष्ण गुरले सरपंच मीनाताई मोटाडे, उपसरपंच प्रेमलता वाघमारे, भाजपाच्या ललिता कांबळे, अनुसया फड, शिला आचार्य, अयोध्या आंबेकर, पार्वती सोमवंशी, शिवकन्या गंगणे, जयश्री अनगुठे, शोभा संपत्ते, पार्वती गुडे, अयर्ना मोटाडे, धोंडीराम हलकुडे, जयराम कस्तुरे, डॉ. हेरकर भागवत गीते, गोपाळ शेंडगे, मारुती गालफडे, राम भंडारे, सतीश कुलकर्णी, शफिक पठाण, इसाक शेख, बाबुराव कस्तुरे, बाळू भंडारे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते आणि त्या त्या भागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## महाविकास आघाडीचा विचार लातूरात बळकट करा कोरोना काळात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल युनायटेड नेशन वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन व सर्वोच्च न्यायालयाने घेतली

लातूर (प्रतिनिधी) : गुरुवार दि. ३१ ऑक्टोबर २४



महाविकास आघाडी सरकारने कोरोना काळात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल युनायटेड नेशन वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन व सर्वोच्च न्यायालयाने घेतली मात्र कोरोना काळात भाजप नेते कटकारस्थान षड्यंत्र रचून त्यांनी महाविकास आघाडीचे सरकार पाडले. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा विचार लातूरात बळकट करा, या लातूरला आता महाराष्ट्रात काम करण्याची संधी आहे, असे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी यांनी गुरुवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी लातूर शहरातील गंजगोलाई परिसरातील मेन रोडवरील सचिन लोहीया यांच्या टिप–टॉप कलेक्शनला भेट देऊन पाहणी करून दीपावली सणातील व्यापाऱ्याची उलाढाल आदीसह विविध विषयावर चर्चा करून सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या, याप्रसंगी ते बोलत होंते..

यावेळी माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोईज शेख, लातूर रेडिमेड कापड असोसिएशन अध्यक्ष तुकाराम पाटील, दिनेश इनानी, अभय शहा डी.एन.शेळके, उद्धव पिनाटे, मुकेश जोधवानी, विजय वर्मा, आनंद मालू, शरद हंचाटे, संजय पतंगे, शेखर मुक्कावार, आप्पा खेकडे, गोविंद हेड्डा, व्हा. चेअरमन विजय देशमुख, गिरीश ब्याळे, यशपाल कांबळे, अभिषेक पतंगे, नितीन शेळके, रईस टाके, व्यंकटेश पुरी, सचिन राठोड, आबू मनियार, राजकुमार शेळके, मुन्ना तळेकर, असलम शेख, सिराज शेख आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी लोहीया कुटुंबीय मित्रपरिवार व्यापारी उपस्थित होते.

महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारने कोरोना काळात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल युनायटेड नेशन वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन व सर्वोच्च न्यायालयाने घेतली मात्र कोरोना काळात भाजप नेते कटकारस्थान षड्यंत्र रचून त्यांनी महाविकास आघाडीचे सरकार पाडले. महाविकास आघाडीचा विचार लातूरात बळकट करा, या लातूरला आता महाराष्ट्रात काम करण्याची संधी आहे, या दिवाळीत लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रयत्नामुळे लातूर पुणे इंटरसिटी विशेष रेल्वे सुरू झाली, लातूर शहरात फेक नॅरेटिव्ह तयार करण्याचा विरोधक प्रयत्न करत आहेत, त्यांना कोणीही बळी पडू नये, भारतीय जनता पक्षाला लातूर शहर विधानसभेत अजूनही उमेदवार सापडत नाहीत, भाजप कार्यकर्त्यांनी पक्षासाठी आयुष्य झिजवायच आणि उमेदवारी मात्र दुसरेच घेऊन जातात, महाराष्ट्राची अस्मिता धर्म पाळून महाराष्ट्राला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्याची आता गरज आहे, असे सांगून त्यांनी येत्या २० नोव्हेंबरला महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन केले.

## छातीत दुखत असल्याने प्रकाश आंबेडकरांना पहाटे रुग्णालयात दाखल केले



पुणे:वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांना छातीत दुखू लागल्याने आज (गुरुवारी,३१ ऑक्टोबरला) पहाटेच्या सुमारास पुण्यातील रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. प्रकाश आंबेडकर यांना छातीत दुखत असल्याने रुग्णालयात दाखल केले आहे. आंबेडकर यांच्यावर अँजिओग्राफी होणार असल्याची माहिती आहे. प्रकाश आंबेडकर यांची तब्येत सध्या स्थिर असल्याची माहिती पक्षातील प्रवक्त्यांनी दिली आहे. हृदयात रक्ताची गाठ असल्याने त्यांना पुण्यातील खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. पुढील ३ ते ५ दिवस त्यांच्यावर रुग्णालयात उपचार केले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. पुढील ३–५ दिवस बाळासाहेब रुग्णालयात डॉक्टरांच्या निरिक्षणात राहणार असल्याने, वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ताई ठाकूर, निवडणूक समन्वय समिती, जाहीरनामा समिती आणि माध्यम आणि संशोधन विभागाच्या सहकार्याने पुढील काही दिवस वंचित बहुजन आघाडीच्या प्रचाराचे नेतृत्व करणार आहेत.




## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भाजपा मीडिया सेंटरला भेट,पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा




मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर प्रदेश भारतीय जनता पार्टीने कफ परेड येथे सुरू केलेल्या सुसज्ज मीडिया सेंटरला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी भेट देऊन पत्रकारांशी अनौचारिक गप्पा केल्या. या सेंटरमध्ये पत्रकारांना माहिती देण्यासाठी उपलब्ध केलेल्या सुविधांची श्री. फडणवीस यांनी प्रशंसा केली. श्री.फडणवीस यांच्यासमवेत प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आणि भाजपा प्रदेश माध्यम विभागप्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. यावेळी पत्रकारांशी वार्तालाप करत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी निवडणुकीसंबंधित पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्र्नांना दिलखुलास उत्तरे दिली.यावेळच्या हास्यविनोदामुळे मीडिया सेंटर हास्यकल्लोळात बुडाले होते.

या अत्याधुनिक मीडिया सेंटरमधील सुविधांचा इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच वृत्तपत्रांच्या पत्रकारांना वार्तासंकलन कामी लाभ घेता येईल, असे सांगत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी त्याबद्दल समाधान व्यक्त केले.या मीडिया सेंटरमध्ये पत्रकार परिषदेसाठी भव्य सभागृह,इलेक्ट्रॉनिस मीडियासाठी स्टुडिओ, संपर्क यंत्रणा अशा सुविधा उपलब्ध आहेत.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## काय बोलता राव ?

लातूर शहर किंवा जिल्ह्यातील विधानसभा निवडणूकी बाबत माझे कांही देणे, घेणे नाही. पंरतू लातूर शहर विधानसभा निवडणूकी मध्ये माझी स्न–षा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर ही लातूर शहर विधानसभा मतदार संघात कॉंग्रेसच्या अमित देशमूख यांच्या विरोधात उमेदवार असली तरी ती माझ्या कुटूंबातील आहे, तीला माझा आशिर्वाद आहे, पण मी कोणाच्याही प्रचारात नाही, अशी स्पष्ट ग्वाही माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी काल दिली.

**काय बोलता राव !**

अरे, ते शिवराज पाटील चाकूरकर आहेत, महाराष्ट्र विधानसभेच्या उपसभापती पासून खासदार केंद्रीय मंत्री, लोकसभा अध्यक्ष, राज्यपाल झालेले आहेत. कारण ते एक वचनी मित्तभाषी असले तरी एकनिष्ठी कॉंग्रेशी आहेत. पंरतू त्यांच्या देव घरतील देव हा अमित देशमूख यांच्या पाठीशी आहे, असे देशमूख यांनी म्हटले होते. पंरतू याच देव घरातून सुर्याजी पिसाळ कासा काय पुढे येतो, या बद्दल राजकीय वर्तूळात वेगवेगळी प्रतिक्रिया व्यक्त होत असली तरी महाराष्ट्राच्या राजकारणात कोणत्याही माध्यमातून सत्ताकारण करावे यासाठी डॉ. अर्चना शैलेश पाटील चाकूरकर ही शिवराज पाटील चाकूरकरांच्या देव घरातून राजकीय क्षेत्रात पुढे सरसावते यातील गांभीर्य लातूर शहर आणि जिल्ह्यातून कॉंग्रेसला मातीमोल करायचे असावे की काय, ही तृप्त इच्छा शिवराज पाटील चाकूरकर हे अर्चनाताई चाकूरकर यांच्या माध्यमातून पूर्ण करीत असतील की काय अशीच प्रतिक्रिया प्रसार माध्यमातून व्यक्त होताना दिसते आहे, मग बोला दाजीबा !

# राज्यकर्त्यानो गरीबाचे काय करणार ?

## संपादकीय...

निवडणूक कोणती ही असेल ती शहरी, खेड्यापाड्यातील, तांड्या, वाडीवरील मध्यमवर्गीय, मागासवर्गीय गोरगरीबांच्या मतदानावरच ती, ती निवडणूक अवलंबून असते. या संदर्भातील चोखामेळा घेतला तर निवडणूकीपूर्ते मतदाराला गोंजारायचे आणि निवडणूक संपली की, तो मतदार मेला की जिवंत आहे, याचे देणे, घेणे कोणत्याही राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधीना नसते, त्यात भाजपा, कॉंग्रेस, शिवसेना आणि जे कोणी ये, रे गबाळे असतील ते सारे गुन्हेगारच ठरावेत अशीच आजघडीला समाज माध्यमातून कुजबूज होताना दिसते आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने भाजपा प्रणीत महायुती आणि कॉंग्रेस प्रणीत महाविकास आघाडी परस्पर विरोधी निवडणूक लढविताना दिसतात. दोन्ही बाजूचा कौल असा की, आम्हाला सत्ता मिळाली पाहिजे, पण सत्तेच्या राजकीय सारीपाठात मतदाराची जी कांही मरामत होते, त्याकडे दुर्लक्ष करुन केवळ भावणीक आव्हणावर भुलभुलया खेळी करुन गोर गरीबांना कसे हाताळायचे हे राजकर्त्या समोर धोरणात्मक उत्तर नसावे यामुळे जे शोशीत पिडीत आहेत, त्यांच्याच मतदानावर राजकारण, सत्ताकारण करणाऱ्या सर्वपक्षीय नेत्याना लाज, लज्जा कशी नसावी अशीच कुजबूज सर्वसामान्यातून होताना दिसते आहे. कारण असे की, एखाद्या राजकीय नेत्यानी कारखानदारी उभी केली, शैक्षणीक संस्था उभी केली आणि त्यातच सेवाभावी संस्थेची अडगळ टाकून अर्थकारण सुरु केले आणि त्यातून गोर गरीबांना वेठीस धरले तर त्यावेळी लोकप्रतिनिधीचे डोळे आंधळे असतात की, ते गैरमालूम आंधळे होवून बसतात. त्यामूळे रबरी शिक्का बनलेले लोकप्रतिनिधी सत्ताकारणातील मिंधे असावेत की काय, अशीच लोकप्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

सत्तेच्या हव्यासापोठी भाजपाने शिवसेने मध्ये फाटाफुट केली. त्यातूनच राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये ही मतभेदातून सत्तेच्या हव्यासापोठी फूट पडली गेली, आणि धर्मनिरपेक्ष पुरोगामी महाराष्ट्राच्या सत्ताकारणाला फाटाफुटीचा डाग लागला. त्यामूळे शरद पवार यांनी कॉंग्रेसला जवळ करुन जे कांही धडपड केली, त्या धडपडीचा ही बोजबारा होतो की काय, अशीच कुजबूज प्रसार माध्यमातून होताना दिसते आहे. कारण असे की, भाजपाचे देवेंद्र फडणवीस, बंडखोर राष्ट्रवादीचे अजित पवार आणि शिवसेनेच्या दगाबाज नेतृत्व असलेले शिंदे हे केवळ शरद पवार यांच्याच विरोधात टिका टिप्पणी करत असताना दिसतात. कारण देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, आणि अजित पवार यांना त्यांचीच सत्ता महाराष्ट्रात येणार आहे, असा विश्वास असताना ही, शरद पवार यांच्यावर बोटे मोडून काय साध्य करणार आहेत, हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो. वास्तविक पाहाता भारतीय राजकारणात आजघडीला शरद पवार यांच्यासारखा धुरीण राजकारणी नेता असावा की नसावा हा विषय बाजूला ठेवून किमानपक्षी महाराष्ट्र हा जातीयवादी, धर्मवादी विचाराच्या हस्तकातून महाराष्ट्राला उभे करायचे असेल तर शरद पवार यांच्याशिवाय पर्याय नसावा असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने जातीय समिकरणातून मराठा मुस्लिम, दलित ओबीसी, बहुजन अल्पसंख्याकाना हाताशी धरुन सर्वच राजकीय पक्षाचे नेते आपापल्या महायुती, महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदान करावे अशी गळ घालीत असताना सर्वसामान्य जनते समोर राज्यकर्त्यानो गोरगरीबांचे काय हा विषय अनुत्तरीत असताना दिसतो आहे, त्याचे स्पष्टीकरण विधानसभा निवडणूकीच्या मतदाना पुर्वी कोणताही राजकीय पक्षाचा नेता उत्तर देईल काय, अशी ही कुजबूज सर्वसामान्यातून होताना दिसते आहे. कारण असे की, सर्वच राजकीय पक्षाचे नेते हे सत्तेसाठी हापापलेले आहेत. त्यांना सर्वांगीण विकास, मानवी हक्क, किंवा सामाजीक परिवर्तना बद्दल कांही देणे घेणे नसल्यामूळे भाऊ, भाऊ, बहीण भाऊ, चुलते, पुतणे, काका, काकू, नणंद, भावजय असा जो परस्पर विरोधी निवडणूक संदर्भातील नौटंकी पणा केला जातो आहे, त्यामूळे हिजडा ही मान घाली घालू शकेल अशी अवस्था राजकर्त्याची झाली असल्याची दिसते आहे. त्यामूळे राज्यकर्त्याना गोरगरीबांचे काय देणे, घणे असावे, तो वर्ग मेला, भुयीसपाट झाला तरी सत्ता आमचीच राहीली पाहिजे अशीच राज्यकर्त्याची इच्छा प्रकट होताना दिसते आहे. त्यामूळे मतदारांनी कोणता झेंडा हाती घ्यावा अशीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे. त्यामून एकमेकावर आगपाकड करणाऱ्या महायुती, महाविकास आघाडीतील कोणताही खंबीर नेता आम्ही तूमच्या पाठीशी आहोत असे आश्वासक ग्वाही देण्यासारखा माणूस समोर येताना दिसत नाही. त्यामूळे उद्याच्या विधानसभा निवडणूकीत सत्ताधारी की विरोधक हा तोलामोलाचा प्रश्न मतदाराना भेडसावणारा दिसतो आहे, त्यातून कधीकाळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी मध्ये सेनापती बापट यानी महाराष्ट्र मेला तर राष्ट्र मेले, अर्थात भारत गेला, हे गीत गायीले होते. ही आठवण महाराष्ट्राच्या राजकारणात तोंड खुपसून बसलेल्या देवेंद्र फडणवीस, उध्दव ठाकरे, एकनाथ शिंदे, पृथ्वीराज चव्हाण आणि जाणकार शरद पवार यांच्या खोपडीत बापट दिसतात काय, मग ते कोणाला विचारावे हा प्रश्न मतदारांच्या न्यायपिठात असावा मग गरीबांचे काय?

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा असो वा झोपडीत राहणारा प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान ममुलेच नाही तर भावा – बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण – भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली होती. सुदैवाने यावेळी दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी करता येणार आहे. त्यामुळे लोकांच्या उत्साहाला उधाण आले आहे. या वर्षी महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. हा उत्साह पुढे देखील असाच कायम राहणार आहे कारण दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा, प्रसन्नतेचा उत्सव आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....! बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# भाजपाच्या सर्व माजी नगरसेवकांची संवाद बैठक डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या विजयाचा भाजपा कार्यकर्ते – पदाधिकाऱ्यांचा निर्धार

लातूर : लातूर शहरातील भाजपचे सर्व माजी नगरसेवक – पदाधिकाऱ्यांची संवाद बैठक राजा नारायणलालजी लाहोटी स्कुलमध्ये गुरुवारी संपन्न झाली. यावेळी भाजपा कार्यकर्ते – पदाधिकाऱ्यांनी डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या विजयाचा निर्धार केला.

यावेळी माजी खासदार सुनील गायकवाड, भाजपाचे विधानसभा प्रभारी शैलेश लाहोटी ,भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,जिल्हा सरचिटणीस दिग्विजय काथवटे, शिरीष कुलकर्णी, दिपक मठपती आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या बैठकीत भाजपा कार्यकर्ते – पदाधिकाऱ्यांनी आपआपला परिचय करून दिला.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी या निवडणुकीत आपल्याला विरोधकांना धक्का द्यायचा आहे. त्यामुळे सर्वांनी एकमेकांना समजून घेऊन काम करणे आवश्यक आहे. आपल्याला विरोधकांचा नाही तर आपणच आपला प्रचार करायचा आहे. पदाधिकारी – कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करावे,असे आवाहनही त्यांनी केले.

या बैठकीत बोलताना शैलेश लाहोटी यांनी प्रत्येक माजी नगरसेवक, भाजप पदाधिकाऱ्यांनी आपपल्या वार्डात , प्रभागात बुथनिहाय फिरून मतदारांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे असे आवाहन केले. डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या विजयासाठी प्रत्येकाने आपलीच निवडणूक आहे असे समजून कामाला लागायचे आहे. डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना विजयी केल्याशिवाय कोणीही स्वस्थ बसायचे नाही,असा निर्धार करण्याचे आवाहनही शैलेश लाहोटी यांनी केले.

भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना भाजप पदाधिकारी – कार्यकर्त्यांनी आपले मतभेद विसरून डॉ. अर्चनाताईंच्या विजयासाठी अहोरात्र परिश्रम घेण्याचे आवाहन केले. आपण कितीही मोर्चे, आंदोलने केली तरी त्याचा फारसा उपयोग होत नाही. आपल्या शहराचा आमदार आपल्याच पक्षाचा, भाजपचा झाल्याशिवाय आपल्याला मुबलक विकास निधी मिळू शकणार नाही. त्यामुळे येणाऱ्या १५ दिवसात सर्वांनी जीवापाड मेहनत करून डॉ. अर्चनाताई पाटील यांच्या विजयासाठी सर्वतोपरी परिश्रम करण्याची तयारी ठेवावी,असे सांगितले. यावेळी सर्व नगरसेवक, कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# शहरासह तालुक्यातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांचे आवाहन

भोकर/सिद्धार्थ जाधव/होऊ घातलेल्या भोकर विधानसभा सार्वत्रिक निवडणूक व नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक ३० ऑक्टोबर रोजी शहरात भोकर पोलिसांच्या वतीने रूट मार्च काढून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याचे आव्हान करण्यात आले आहे.



भोकर विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ व नांदेड लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लावण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या हेतूने शहरासह तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, सहाय्यक पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली व भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश जाधव

यांच्या उपस्थितीमध्ये दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ रोजी भोकर शहरातील प्रमुख मार्गाने रूट मार्च घेण्यात आला या रूट मार्चमध्ये बीएसएफ चे १० अधिकारी ४२ जवान व भोकर पोलीस ठाण्यातील ३ अधिकारी १५ पोलीस अमलदार हजर होते.

भोकर विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने इच्छुक उमेदवारांच्या वतीने प्रचार संदर्भाने भोकर शहरात शक्ती प्रदर्शने करण्यात येत आहेत या दरम्यान पोलिसांनी शहरात केलेल्या या पोलिसांच्या शक्ती प्रदर्शनाने शहरासह तालुक्यातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहणार आहे.

# इराणने इजरायलवर केलेला हल्ल्याचे ;प्रत्युत्तर २६ आक्टोंबरला इजरायलने दिल्याने पश्र्चिम आशियामध्ये तणावाचे वातावरण.

पश्र्चिम आशियातील तणाव मंगळवार दिनांक १ आक्टोंबर २०२४ ला अधिकच वाढला.कारण इराणने रात्री इजरायलवर अचानक क्षेपणास्त्र हल्ला केला होता.या हल्यापुर्वी काही वेळ आधी इजरायलची राजधानी तेल अवीवमध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. त्याच दिवशी सायंकाळी इराणने इजरायलवर १८० पेक्षा अधिक क्षेपणास्त्र डागली. इराणची शक्तीशाली मानल्या जाणारी फतह–२ बलिस्टिक मिसाईलचा सुध्दा यात समावेश करण्यात आला होता.काही क्षेपणास्त्रे इजरायलने हवेतच भेदले. परंतु काही क्षेपणास्त्रानी इजरायलला मोठे नुकसान पोहचविले.कारण इराणने इजरायलवर केलेला हल्ला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला असल्याचे इजरायल सुत्रांकडून सांगण्यात आले होते.

इरानच्या इजरायलवरील हल्लयामुळे इराण व लेबनॉनमध्ये त्यावेळेस खुशीचे वातावरण दिसून आले होते.यामुळे इजरायलची तळपायाची आग मस्तकात गेली व बदल्याच्या भावनेने इजरायल इराणकडे पहायला लागला.इजरायल कोणत्याही परिस्थितीत इराणला सोडणार नाही व बदल्यांच्या भावनेतून रणांगणात उतरून बदला अवश्य घेईल याचा अल्टिमेट इजरायलने इराणला हल्लयानंतर दिलेला होता आणि इजरायलने ते दिनांक २६ आक्टोंबर २०२४ शनिवारला पहाटे १०० इजरायलली विमानांनी इराणवर स्ट्राईक केला यामध्ये २ महीला वैमानिक सुध्दा होत्या.इजरायलने इराण मधील २० लष्करी ठिकाणांवर लक्ष करत हल्ले करण्यात आले.इजरायल लष्कराने या संदर्भात काही व्हिडिओ आणि छायाचित्रे जारी केली आहेत.या स्ट्राईकमध्ये एफ–१५,एफ–१६ आणि एफ–३५ विमानांचा वापर इजरायलने केला.या घटनेमुळे पश्र्चिम आशियामध्ये तणाव मोठ्या प्रमाणात वाढला असून इराणकडून प्रती हल्ला होण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे पश्र्चिम आशियामध्ये युद्धाची चिंगारी केव्हाही भडकु शकते. आता इराण–इजरायल संघर्ष बदल्याच्या भावनेमुळे विकोपाला गेल्याचे दिसून येते.यामुळे दोन्ही देशांकडून शाब्दिक चकमक जोरदार सुरू झाली असून इजरायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू व इराणचे सर्वेसर्वा अयातुल्ला अली खोमेनेई एकमेकांना युध्दाची धमकी देत आहेत. परंतु खोमेनी यांनी हल्यास प्रत्युत्तर देण्याबाबत कोणतेही स्पष्ट वक्तव्य केले नाही. याशिवाय इराणच्या अधिकाऱ्यांनीही प्रतिहल्लयाचे संकेत देणे टाळले.परंतु हमास, हिज्बुल्ला, हुती विद्रोही लगातार इजरायलवर हल्ले करीत आहे.गाझा आणि लेबनॉनमध्ये युद्धविराम कोणत्याही प्रत्युत्तरापेक्षा महत्वाचा आहे असे इराणला वाटत आहे. इजरायल प्रत्युत्तरादाखल कधीतरी हल्ला करणार हे सर्वांनाच माहीत होते.या हल्लयानंतर आखातात मोठे युद्ध भडकण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. हमास–हिज्बुल्ला आतंकवाद्यांचे महत्वपूर्ण ठीकाण गाजा व लेबनॉनमध्ये असल्याने इजरायल कडून मोठ्या प्रमाणात ताबडतोब हवाई हल्ले व क्षेपणास्त्र हल्ले आताही सुरूच आहे.यात आतंकवादी तर मरत आहेच सोबतच सर्वसामान्य नागरिकांची सुध्दा मोठ्या प्रमाणात जिवीत हाणी होत आहे. अयातुल्ला अली खोमेनेई यांनी इजरायलवर १८० मिसाईल डागुन हमास –हिज्बुल्ला आतंकवाद्यांचे मनोबल तर वाढविले.परंतु इजरायलने इराणवर केलेल्या हल्लयाला प्रत्युत्तर देण्यास खोमेनी हिचकीचा्तांना दिसतात. लेबनॉनमधील हिजबुल्ला या आतंकवादी गटांशी इजरायल सैन्याचे युद्ध सुरू असतांनाही;इजरायल अजूनही गाझामध्ये दररोज मोठ्या प्रमाणात हल्ले करीत आहे. इजरायलने २६ आक्टोंबरपासुन चारही बाजूंनी हल्ले तेज केल्याचे दिसून येते. इजरायलचे येमेनमधील हुथी विद्रोही व सीरिया आणि इराकमधील आतंकवादी संघटना यांच्यावर इजरायलने हल्ले अती तिव्र केले आहे. इजरायलने इराणला चेतावणी दिली आहे की, यदाकदाचित इराणने इजरायलवर हल्ला केलाच तर इराणला संपूर्णपणे नेस्तनाबूत करण्यात करण्यात येईल. म्हणजेच इराण –इजरायल युद्ध भयावह होण्याची दाट शक्यता आहे.इजरायलचा अती आक्रमकपणा पहाता इराणने रक्षाबजटमध्ये २०० प्रतीशत वाढ केल्याचे सांगितले जाते. तर दुसरीकडे अमेरिकेकडून इजरायलला आय. डी.एफ.७० टक्के योगदान देत आहे म्हणजेच अमेरिका इजरायलला सर्वोतोपरी मदत करीत आहे.इजरायलचे हमास –हिज्बुल्ला–इराण यांच्याशी संघर्ष सुरू असतांना हूती विद्रोहींनी इजरायलच्या ३ कार्गो शिपवर हल्ला करू मोठे नुकसान पोहोचविले आहे. त्याचप्रमाणे भुमध्यसागरी किनाऱ्यावरील इजरायलच्या दक्षिणेकडील जिल्ह्यातील एक तटीय शहर अश्कलोन शहर आहे यावर सुध्दा हुती विद्रोहींनी हल्ला केल्याचे समजते.तर दुसरीकडे इजरायलने गाजावर ताबडतोब हल्ले सुरू केले आहेत यात २४ तासात १४३ लोकांचा जीव गेल्याचे सांगितले जाते.इजरायलच्या वेस्ट गलीली व रोशपिना याठिकाणी हिज्बुल्लाने मोठे हल्ले केले आहेत याठिकाणी दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.इजरायलने सुध्दा हिज्बुल्लाचा हथियार डीपो व अंडरग्राऊंड बेस नष्ट केल्याचा दावा केला आहे.यामुळे सध्याच्या परिस्थितीत हमास,हिज्बुल्ला,हुती विद्रोही,इराण–इजरायल यांचा संघर्ष अती टोकाला गेल्याचे दिसून येते. इजरायलवर हमास,हिज्बुल्ला, हुती विद्रोही, इराण यांचे चौतर्फा हल्ले पहाता इजरायलने टी. एच.ए.ए.डी.सिस्टम तैनात करण्यात आली आहे.म्हणजे हा संघर्ष थांबण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नसल्याचे चित्र दिसून येते.त्यामुळे याचे दुष्परिणाम पश्र्चिम आशियासह संपूर्ण जगाला भोगावे लागेल.त्यामुळे ताबडतोब युद्ध थांबने गरजेचे आहे व जगाला विनाशापासुन वाचविले पाहिजे.याकरीता संयुक्त राष्ट्रसंघाने ताबडतोब हस्तक्षेप करावा.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# महायुतीचेच सरकार येणार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्र्वास

मुंबई : राज्यातील जनतेचा महायुतीवर पूर्ण विश्र्वास असल्यामुळे राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा येणार आणि महायुतीचा मुख्यमंत्री होणार असा विश्र्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी व्यक्त केला. मुंबई महानगरपालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते, ज्येष्ठ काँग्रेस नेते रवी राजा, उबाठा चे उपविभागप्रमुख बाबू दरेकर यांनी त्यांच्या सहका–यांबरोबर भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमामध्ये श्री. फडणवीस बोलत होते. मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, आ. तमिल सेल्वन, आ. पराग शहा, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, अतुल शाह, राजेश शिरवडकर आदी यावेळी उपस्थित होते. श्री. फडणवीस आणि श्री. शेलार यांनी रवी राजा, बाबू दरेकर यांचे आणि त्यांच्या सहका–यांचे भारतीय जनता पार्टीत स्वागत केले. यावेळी रवी राजा यांची भाजपा मुंबई उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे आ. शेलार यांनी जाहीर केले. यावेळी श्री. फडणवीस म्हणाले की, **(पान ४ वर)** ...

# टाटा ग्रुप कंपनीचे संस्थापक जमशेटजी टाटा ते रतन टाटा

भारतात आजच्या घडीला सार्वजनिक आरोग्य,शिक्षण आणि रोजगार देणारे उद्योग भांडवलदार स्वतःच्या फायद्यासाठी घेऊन त्यांचा धंदा करीत आहेत. त्यातुन भारतीय नागरिकांचे जेवढे शोषण करता येईल तेवढे शोषण करणारी यंत्रणा उभी करीत आहेत. ज्यांनी देशासाठी कोणतीही गोष्ट निर्माण केली नाही.तेच उद्योगपती देशातील सार्वजनिक सेवा देणारे उद्योग टाटा घराणे : भारतातील लोखंड व पोलाद उद्योगाचा पाया घालणारे,तसेच भारताच्या औद्योगिक प्रगतीकरिता कापडगिरण्या, जलविद्युत्प्रकल्प उभारणारे जगप्रसिद्ध कारखानदार, व्यापारी,दानशूर व देशभक्त घराणे.टाटा उद्योगसमूहाचे संस्थापक जमशेटजी नसरवानजी, त्यांचे दोन सुपुत्र सर दोराबजी व सर रतनजी आणि जमशेटजींचे पुतणे जहांगीर रतनजी दादाभाई (जे. आर.डी) हे या घराण्यातील धडाडीचे, कल्पक व दीर्घोद्योगी असे कर्ते पुरुष होत. एकाच घराण्यातील तीन कर्तबगार पिढ्यांनी घडवून आणलेला देशाचा प्रचंड औद्योगिक विकास, ही एक अनन्यसाधारण वस्तुस्थिती होय.

टाटा उद्योगाचे आद्य प्रवर्तक जमशेटजी नसरवानजी (३ मार्च १८३९–१९ मे १९०४) यांचा जन्म गुजरात राज्यातील नवसारी येथे एका पारशी घराण्यात झाला. जमशेटजींच्या वडिलांची मुंबईत व्यापारी पेढी होती. वयाच्या तेराव्या वर्षी ते शिक्षणासाठी मुंबईस आले. १८५६–५८ या काळात त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमधून शिक्षण घेतले. रामकृष्ण गोपाळ भांडारकर व दिनशा वाच्छा हे जमशेटजींचे सहाध्यायी होते. १८५८ मध्ये जमशेटजी एल्फिन्स्टनमधून 'ग्रीन स्कॉलर' (पदवीप्राप्त) म्हणून उत्तीर्ण झाले. विद्यार्थिदशेत असतानाच जमशेटजींचा करसेटजी डाबू या पारशी गृहस्थांच्या हीराबाई या कन्येशी विवाह झाला. दोराबजी (जन्म १८५९) व रतन (जन्म १८७१) हे त्यांचे पुत्र. १८५९ मध्ये जमशेटजी आपल्या वडिलांच्या व्यवसायात शिरले. याच सुमारास हाँगकाँगच्या 'जमशेटजी ड अर्देशिर' शाखेच्या व्यवहारात लक्ष घालण्यासाठी त्यांना हाँगकाँगला पाठविण्यात आले. तेथूनच पुढे ते शांघायला गेले व तेथे त्यांनी दुसरी शाखा उघडली. १८६५ मध्ये यंत्रविद्येचे ज्ञान मिळविण्यासाठी जमशेटजी मँचेस्टरला गेले. इंग्लंडमध्ये ते चार वर्षे होते. स्वदेशी परतल्यावर त्यांनी मुंबईच्या चिंचपोकळी भागातील दिवाळे निघालेली एक तेलगिरणी विकत घेऊन तिचे कापडगिरणीत रूपांतर केले. तिचे 'लेक्झांड्रा मिल' असे नामकरण करून त्यांनी आपल्या औद्योगिक कारकीर्दीस प्रारंभ केला. या पहिल्याच उपक्रमामुळे जमशेटजींना कीर्ती व संपत्ती या दोहोंचाही लाभ झाला. जमशेटजींनी ही भरभराटीस आणलेली गिरणी विकून टाकली. यानंतर मोठ्या आकारामानाची कापडगिरणी स्थापण्याचा संकल्प सोडून ते कापडउद्योगाचे अधिक शास्त्रशुद्ध ज्ञान मिळविण्याकरिता पुन्हा इंग्लंडला गेले. तेथे फिरोजशहा मेहतांशी त्यांचा घनिष्ठ स्नेह जडला. १८७४ मध्ये भारतात परतल्यावर अनेक मित्रांचा विरोध असूनही जमशेटजींनी मुंबईऐवजी नागपूर येथे 'एम्प्रेस मिल्स' ही कापडगिरणी सुरू केली (१ जानेवारी १८७७) एम्प्रेस मिल्सच्या स्थापनेपासूनच जमशेटजींनी कामगार कल्याण योजना कार्यान्वित केल्या. कुर्ला येथील 'धरमसी मिल' ही जुनी गिरणी विकत घेऊन (१८८६) तिचे 'स्वदेशी मिल्स' मध्ये रूपांतर करून त्यांनी कापडधंद्याचा विस्तार केला. त्याच वर्षी जमशेटजींनी अहमदाबाद येथील 'डव्हान्स मिल्स' ही कापडगिरणी भरभराटीस आणली. स्वदेशी मिल्स या गिरणीच्या रूपाने जमशेटजींची स्वदेशी चळवळीबद्दल वाटणारी आस्था प्रकट झाली, तर डव्हान्स मिल्सच्या रूपाने त्यांचा कापडउद्योगातील आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन दिसून आला. भारतीय कापडउद्योगाचे आधुनिकीकरण करण्याचे श्रेय जमशेटजींना द्यावे लागते. त्याच्याच अनुषंगाने भारतात लांब धाग्याचा कापूस उत्पादनाकरिताही त्यांनी प्रयत्न केले.

जमशेटजींनी आपल्या कापडगिरण्यांचे व्यवस्थापन म्हणजे वित्तपुरवठा, यंत्रसामग्री, देखभाल आणि कामगारकल्याण इ. कार्यक्षम राखले होते. उद्योगधंद्यांतील सम्यक अर्थप्रबंधासाठी त्यांनी दाखविलेली योजकता व उपक्रमशीलता ही अनन्यसाधारण होती. परिणामतः त्यांनी प्रत्येक गिरणीतून तुलनेने अधिक नफा मिळवून दाखविला. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात असताना, जमशेटजींनी 'टाटा लोखंड व पोलाद कारखाना', जमशेटपूर व 'टाटा हायड्रो–इलेक्ट्रिक कंपनी' या दोन प्रकल्पांचे आराखडे वा योजना तयार केल्या. नागपूर, मुंबई, अहमदाबाद येथील गिरण्यांतून त्यांनी प्रासंगिक अकुशल कामगारांचे कुशल कामगारवर्गात रूपांतर केले. त्यांच्या कल्याणार्थ अनेक गोष्टी केल्या. कामगारांना अद्ययावत यंत्रसामग्री हाताळण्याचे प्रशिक्षण दिले.टाटा कंपनीत आज ही पाचव्या सहाव्या पिढीचे तरुण नोकरी करीत आहेत.

मुंबई शहरातील सुधारणांशी जमशेटजींचा संबंध १८६३ पासूनच होता. १८९० पासून त्यांनी मुंबईतील जमीनजुमल्यांच्या खरेदीस प्रारंभ केला. ते व त्यांचे कुटुंबीय एका वास्तूत बराच काळ कधीच राहिले नाहीत. वारंवार त्यांनी नवनवीन जमिनी खरेदी केल्या व त्यांवर इमारती बांधल्या. घरे बांधणे हा जमशेटजींचा एक आवडता छंद होता. त्यांनी मध्यमवर्गातील पारशी लोकांकरिताही घरे बांधली. शहरात उभारलेल्या अनेक भव्य इमारती म्हणजे टाटांच्या दानशूरत्वाचेच प्रतीक होय. पारशी जिमखाना उभारण्यात त्यांनी बरेच श्रम घेतले. १८९८ मध्ये ताजमहाल हॉटेलाचा शिलान्यास करण्यात आला. त्याला आंतरराष्ट्रीय दर्जा यावा म्हणून जमशेटजींनी यूरोपात दौरा काढून तेथील हॉटेल व्यवसायाचा अभ्यास केला. १९०३ मध्ये ताजमहाल हॉटेल सुरू झाले.जमशेटजींना ब्रिटिशांकित भारतातील सनदी नोकरवर्ग तयार करणारे शिक्षण प्रथमपासूनच आवडत नव्हते. तशातच 'जर हिंदी विश्र्वविद्यालये ही केवळ परीक्षा घेणारी यंत्रे बनतील, तर उच्च शिक्षणाची वाढ हिंदुस्थानात होणे अशक्य आहे', ह्या लॉर्ड रे यांच्या उद्गारांची भर पडली आणि या आक्षेपास उत्तर म्हणून जमशेटजींनी 'भारतीय विज्ञान संस्था' (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) काढण्याचे ठरविले. संशोधनपर व शास्त्रीय दृष्टी येण्यासाठी प्राध्यापक बरजोर पादशहा यांना परदेशांस पाठविले. त्यांनी सबंध यूरोप, अमेरिका यांमधील नामवंत शास्त्रज्ञांच्या गाठीभेटी घेऊन स्वदेशास परतल्यावर जमशेटजींना अहवाल दिला. अमेरिकेतील 'जॉन्स हॉपकिन्स इन्स्टिट्यूट' सारखी संस्था भारतात उभारावयाचे ठरले त्यासाठी जमशेटजींनी ३० लक्ष रु. काढून ठेवले. १९११ मध्ये बंगलोर येथे या संस्थेच्या इमारतीचा पाया घालण्यात आला आणि त्याच वर्षी २४ जुलैपासून संस्था कार्यान्वित झाली. ही एक जगद्विख्यात संस्था मानली जाते.

अर्थव्यवस्थेची प्रगती सातत्याने चालू राहण्यात लोखंड व पोलाद उद्योगाचा फार मोठा वाटा असल्याने जमशेटजींच्या ध्यानात आले होते. बंगालमध्ये लोखंड आणि पोलाद यांच्या निर्मितीची आधुनिक पद्धतीनुसार शक्यता असल्याचा मेजर मॅहोन नावाच्या सरकारी अधिकाऱ्याचा अहवाल त्यांच्या वाचनात आला. त्यानुसार जमशेटजींनी शास्त्रीय ज्ञान संपादन करून संशोधन करविले आणि दोराबजी टाटा यांनी आपले भूवैज्ञानिक प्रमथनाथ बोस यांच्या साहाय्याने बंगालमध्ये लोखंडाच्या टेकडयांचा शोध लावला. याकरिता जमशेटजींनी स्वतःचे व लोकांचे मिळून १६ङ३ लक्ष पौंड भांडवल गुंतविले ते कमी पडू लागताच ग्वाल्हेरच्या महाराजांकडून त्यांना आणखी चार लक्ष पौंड मिळाले व या प्रचंड कामास प्रारंभ झाला. जमशेटजींनी भारताच्या बऱ्याच प्रदेशांची संशोधनपूर्ण पाहणी केली. शेवटी कोळसा व पाणी यांचे वैपुल्य असलेल्या बिहारच्या सिंगभूम जिल्ह्यातील एक स्थान त्यांनी निवडून तेथे पोलादकारखाना उभारावयाचे ठरविले. पूर्वीचे साक्ची नावाचे खेडे जमशेटपूर शहर बनले व तेथे 'द टाटा आयर्न अँड स्टील कंपनी' (टिस्को) हा कारखाना सुरू झाला. खनिज लोखंडापासून उत्कृष्ट पोलादापर्यंतच्या सर्व प्रक्रिया या कारखान्यात पार पाडल्या जातात. जगामधील प्रचंड व प्रगत लोखंड–पोलाद कारखान्यांमध्ये टिस्कोची गणना होते.जमशेटजींनी दुसरी भव्य योजना म्हणजे पश्र्चिमी घाटामधून पडणाऱ्या प्रचंड जलप्रपातांपासून वीजनिर्मिती करणे, ही होय. त्यासाठी या प्रकल्पाची पायाभरणी मात्र ८ फेब्रुवारी १९११ रोजी झाली. फेब्रुवारी १९१५ पासून लोणावळा, वळवण, शिरोटा, ठोकरवाडी व मुळशी या पाच ठिकाणी असलेल्या धरणांच्या पाण्याचा उपयोग करून खोपोली, भिवपुरी व भिरा येथील वीजउत्पादन केंद्रे मुंबईला विजेचा पुरवठा करू लागली.

ब्रिटिश जहाजउद्योगाला टक्कर देण्याकरिता त्यांनी आपली 'टाटा लाइन' ही जहाज कंपनीही उभारली होती. तथापि ब्रिटिश सरकारच्या वाहतूकदरांच्या स्पर्धेत जमशेटजींना आपल्या स्वदेशी जलवाहतूक कंपनीची प्रगती साधणे शक्य झाले नाही व तो नाद त्यांना सोडावा लागला. जो धंदा करावयाचा तो नाविन्यपूर्ण व त्यातील उत्पादन सफाईदार व पहिल्या दर्जाचे असले पाहिजे, या त्यांच्या 'टाटा टच' मुळे बाजारात 'टाटा' या नावाला फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली.जमशेटजींनी आपल्या औद्योगिक ध्येयवादात स्वदेशाच्या आणि स्वकीयांच्या गरजांची जाणीव सतत राखली होती. त्यांनी दूरदृष्टीने टाटा सन्स लि. या संस्थेची स्थापना करून (१८८७) तिच्याकडे आपल्या सर्व कंपन्यांचे व्यवस्थापन सोपविले. या संस्थेचे ८५ टक्के भांडवल टाटा कुटुंबातील मंडळींनी उभारलेल्या धर्मादाय न्यासांच्या मालकीचे असल्याने टाटा उद्योगसमूहातील विविध उद्योगांना आणि संस्थांना होणारा फायदा न्यासांकडे म्हणजे पर्यायाने जनतेकडे पोहोचविला जातो.भारतातील आधुनिक उद्योगधंद्यांचे प्रवर्तन जमशेटजींनी केले. 'इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीने जर हिंदुस्थानला जावयाचे असेल, तर त्याचे औद्योगिक कार्यक्षेत्र विस्तृत झाले पाहिजे हिंदुस्थानची भौतिक उन्नती होण्याचा शक्य कोटीत असणारा मार्ग हाच आहे', अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. व्यवहारी दृष्टीबरोबरच कल्पकता,उपक्रमशीलता, समयोचितता, धाडसीपणा आणि निकोप व्यापारी दृष्टी ह्या गुणांमुळेच जमशेटजींना अपार यश लाभले. रूढ धंद्यांपेक्षा नवेनवे औद्योगिक क्षेत्र शोधण्याकडे त्यांचा कटाक्ष असे.

राष्ट्रीय व आर्थिक पारतंत्र्याच्या काळात 'स्वदेशी'च्या संकल्पनेला सिद्धीचे रूप देण्यात, देशातील नैसर्गिक साधनसामग्रीच्या शोधाकरीता व विकासाकरिता प्रचंड श्रम घेण्यात आणि वैज्ञानिक अन्वेषणाची प्रेरणा देण्यात जमशेटजी टाटा हे अग्रभागी होते. देशातील खनिजसंपत्तीचा शोध व विकास हा देशातील लोकांनीच देशी भांडवलाच्या साहाय्याने घडवून आणला पाहिजे, या मतावर जमशेटजींचा पूर्ण विश्र्वास होता. यशस्वी उद्योगपती तसेच व्यापारी असूनही त्यांचे औदार्य व दानशूरत्व अनन्यसाधारण होते. औद्योगिक क्रांतीच्या काही अनिष्ट परिणामांचेही त्यांना यथार्थ भान होते. त्यांपासून आपल्या कारखान्यांतील कामगारांना वाचविण्यासाठी कामगार–कल्याणाच्या अनेक योजना त्यांनी अंमलात आणल्या. ग्रंथ वाचणे व टिपणे काढणे, हा त्यांचा आवडता छंद होता. त्यांच्या सर्व लहानमोठ्या औद्योगिक प्रकल्पांना त्या त्या उद्योगधंद्यातील अद्ययावत ज्ञानाचे अधिष्ठान होते. नाउहाइम (प. जर्मनी) येथे वयाच्या पासष्टाव्या वर्षी या महान उद्योगपतीचे निधन झाले. त्यांचे शव लंडनला नेण्यात येऊन २४ मे १९०४ रोजी पारशी धर्मानुसार ब्रुकवुड येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. 'भारतीय व्यापार व उद्योग यांच्या भरभराटीसाठी कोणत्याही तत्कालीन भारतीयाने जमशेटजींइतके प्रयत्न केले नाहीत', हे लॉर्ड कर्झनचे उद्गार यथार्थाने जमशेटजींची थोरवी व्यक्त करतात. त्यांच्या पश्र्चात सर दोराबजी व सर रतनजी या त्यांच्या दोन मुलांनी वडिलांची परंपरा यशस्वीपणे पुढे चालविली.

सर दोराबजी जमशेटजी टाटा : (२७ ऑगस्ट १८५९–३ जून १९३२). जमशेटजींचे ज्येष्ठ पुत्र. जन्म मुंबईस. वयाच्या सोळाव्या वर्षीच ते यूरोपात शिक्षणासाठी गेले. १८७६ मध्ये स्वदेशी परतल्यावर मुंबईच्या सेंट झेवियर महाविद्यालयातून ते बी.ए. झाले (१८८२). लहानपणापासून त्यांचा खेळाकडे, विशेषतः क्रिकेटकडे, विशेष ओढा होता. मर्दानी खेळांच्या आवडीमुळे मुंबईत अनेक व्यायामसंस्था सुरू करण्यात त्यांचा वाटा होता. वडिलांच्या कापसाच्या धंद्याचा विस्तार करून त्यांनी त्याच्या शाखा जगातील प्रमुख शहरांतून उघडल्या. टाटा लोखंड व पोलाद कारखाना, जमशेटपूर बंगलोरची भारतीय विज्ञान संस्था व लोणावळा येथील टाटा इलेक्ट्रिक कंपनीज या कंपन्यांच्या उभारणींमध्ये दोराबजींचा पुढाकार होता. स्त्रीशिक्षणार्थही त्यांनी आर्थिक साहाय्य केले. १९१० साली त्यांना ब्रिटिश सरकारकडून 'सर' हा किताब मिळाला. १९१५ मध्ये भारतीय औद्योगिक परिषदेचे ते अध्यक्ष, तर १९१८ मध्ये नेमलेल्या भारतीय औद्योगिक आयोगाचे ते एक सभासद होते. दोराबजींनी भारताचे औद्योगिकीकरण साधण्याच्या दृष्टीने वडिलांनी सुचविलेल्या अनेक योजनांना मूर्त रूप दिले, त्याचबरोबर समाजसेवेचे ही व्रत अखंडपणे चालविले. मेहेरबाई ह्या आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी तिच्या स्मरणार्थ लेडी टाटा मेमोरियल ट्रस्ट स्थापन केला (१९३२). त्याचा उद्देश रक्तार्बुद विषयक रोगासंबंधी अधिक संशोधन व साहाय्य करणे हा होता. शिक्षणाविषयी दोराबजींचा उदार दृष्टिकोन होता आणि अभियांत्रिकी व वैद्यकीय संशोधन यांमध्ये तर यांना अधिक रस होता. १९२० मध्ये त्यांनी केंब्रिज विद्यापीठास अभियांत्रिकी विभागातील प्रयोगशाळांच्या साधनसामग्रीसाठी २०,००० पौंडांची देणगी दिली. आयुष्याच्या अखेरीस दोराबजींनी आपली सारी संपत्ती आपल्या नावाने उभारलेल्या न्यासास सार्वजनिक कार्यार्थ दिली. १९४५ मध्ये सर दोराबजी टाटा ट्रस्टजवळ सु. २० लक्ष पौंड रक्कम होती तीपैकी सु. आठ लक्ष पौंड रक्कम विविध दानकार्ये व टाटा मेमोरियल (कॅन्सर) हॉस्पिटल, टाटा समाजविज्ञान संस्था, टाटा मौलिक संशोधन संस्था इत्यादींसाठी खर्च करण्यात आली. एप्रिल १९३२ मध्ये दोराबजी धंद्यानिमित्त यूरोपला गेले. किसिंगन (प. जर्मनी) येथे त्यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव अवशेष इंग्लंडला नेण्यात येऊन ब्रुकबुड येथील पारशी कबरस्तानात आपल्या दिवंगत पत्नीशेजारी त्यांचे दफन करण्यात आले.

सर रतनजी जमशेटजी टाटा : (२० जानेवारी १८७१–५ सप्टेंबर १९१८). जमशेटजींच्या या द्वितीय मुलाचा जन्म मुंबईत झाला. वडिलांच्या सर्व परंपरा त्यांनीही पुढे चालविल्या. टिस्कोच्या स्थापनेत त्यांचाही मोठा वाटा होता. रतनजी यांचा बुद्धीमंतांकडे अधिक ओढा होता आणि कलाविषयांमध्ये त्यांना विशेष रस होता. मृत्यूनंतर त्यांचा मोठा कलावस्तुसंग्रह प्रिन्स ऑफ वेल्स वस्तुसंग्रहालयास देण्यात आला. पाटलिपुत्राजवळील एका पुरातत्त्वीय संशोधन मोहिमेसाठी त्यांनी ७५,००० रु. दिले. रतनजींनी म. गांधींना द. आफ्रिकेच्या प्रचार दौऱ्यासाठी सव्वा लाख रु. दिले होते. नामदार गोखले यांच्या कार्याविषयी रतनजींना अपार श्रद्धा वाटत होती म्हणूनच अनेक वर्षे भारत सेवक समाजाला देणग्यांच्या रूपाने त्यांनी सतत मदत केली. दारिद्र्य व तदानुषंगिक सामाजिक समस्यांच्या अभ्यासाकरिता रतनजींनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ड पॉलिटिक्स' या संस्थेत एक रतन टाटा निधी व अध्यासन स्थापन केले. रतनजींनाही 'सर' हा बहुमान लाभला. कॉर्नवॉल (इंग्लंड) येथे वयाच्या अवघ्या ४७ व्या वर्षी रतनजी निधन पावले. मृत्यूसमयी त्यांच्या नावे उभारण्यात आलेल्या सर रतन टाटा ट्रस्ट या न्यासाकडे त्यांनी आपली सर्व वैयक्तिक संपत्ति दिली. त्या वेळी या न्यासाजवळ ८१ लक्ष रु. होते. ह्या न्यासाची बहुउद्देशीय कार्ये असून आतापर्यंत त्याने सु. दोन कोटी रुपयांचा विनियोग जनहितार्थ केला आहे त्यांपैकी जमशेटपूरच्या राष्ट्रीय धातुविज्ञान प्रयोगशाळेस ११ङ७५ लक्ष रुपयांची देणगी देण्यात आली आहे.

जहांगीर रतनजी दादाभाई टाटा (जे. आर. डी. टाटा) : (२९ जुलै १९०४ ). जमशेटजींच्या चुलतभावाचे (रतनजी दादाभाई) पुत्र व टाटा उद्योगसमूहाचे सध्याचे अध्यक्ष (१९७६). त्यांचा जन्म पॅरिसला झाला. १९२२ मध्ये टाटा सन्स लि. मध्ये ते साहाय्यक होते. १९२६ मध्ये ते एक संचालक झाले. १९३८ मध्ये टाटा उद्योगांचे अध्यक्षपद लाभले. भारतीय विज्ञान संस्थेच्या विधिसभेचेही ते अध्यक्ष आहेत. भारतात विमानचालकाचा परवाना मिळविणारे पहिले मानकरी म्हणून ते सर्वश्रुत आहेत. ३ मे १९३० रोजी त्यांनी इंग्लंडला एकट्याने विमानोड्डाण केले. त्यांच्या प्रेरणेने १९३२ साली टाटा सन्स लि. चा एक विभाग म्हणून टाटा एअरलाइन्सची स्थापना करण्यात आली. कराची मुंबई मार्गावरील पहिले उड्डाण स्वतः करून या कंपनीच्या कार्याचा त्यांनी सुरुवात केली (ऑक्टोबर १९३२). १९४६ मध्ये स्थापन झालेल्या एअर इंडिया लिमिटेडचे व १९४८ मध्ये स्थापण्यात आलेल्या एअर इंडिया इंटरनॅशनल लिमिटेडचे ते अध्यक्ष होते. नागरी हवाई वाहतुकीच्या राष्ट्रीयीकरणापासून (ऑगस्ट १९५३) एअर इंडिया इंटरनॅशनल निगमाचे ते अध्यक्ष आहेत. तसेच इंडियन एअरलाइन्स या अंतर्गत हवाई वाहतूक कंपनीचे ते सदस्य आहेत. भारतीय अणुऊर्जा आयोग, केंद्रीय सल्लागारी उद्योग परिषद, राष्ट्रीय अनुप्रयुक्त अर्थशास्त्र संशोधन परिषद यांचेही ते सदस्य आहेत. 'नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्ट्स' आणि 'टाट एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूट' चे अध्यक्ष. १९४८ साली ते संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत भारतीय प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले होते. मिलवॉकी (विस्कॉन्सिन) येथील 'नॅशनल असोसिएशन ऑफ फोरमन' या संस्थेने १९५३ मध्ये 'इंटरनॅशनल मॅनेजमेंट मॅन' (आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन प्रवीण) म्हणून त्यांचा गौरव केला. 'ऑफिसर ऑफ लीजन ऑफ ऑनर' म्हणून फ्रान्स सरकारनेही त्यांचा बहुमान केला (१९५४). भारत सरकारने १९५५ साली त्यांना पद्मविभूषण हा किताब दिला. मद्रास मॅनेजमेंट असोसिएशनने १९६९ साली त्यांना बिझिनेस लीडरशिप पुरस्कार दिला. जे. आर. डीं.नीही १९४४ मध्ये आपल्या नावाचा एक न्यास उभारला आहे. जमशेटजी, दोराबजी, रतनजी या पूर्वसूरींच्या सगळ्या उत्तम गुणांचा परिपाक जे. आर. डी. टाटा यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आढळतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय उद्योगधंद्यांची स्थिती व गरजा या स्वतंत्र भारतातील तशा स्थिति–गरजांपेक्षा वेगळ्या आहेत. या नव्या परिस्थितीची यथार्थ जाणीव ठेवून जे. आर. डीं.नी टाटा उद्योगधंद्यांचा कालोचित विकास साधण्याची दृष्टी ठेवली आहे. जमशेटजींची कल्पकता, उपक्रमशीलता, साहसीपणा आणि दोरबजी–रतनजींचे कलाविद्यांचे व क्रीडेचे प्रेम त्यांच्यात आढळून येते. त्यामुळे एक संपन्न, पुरोगामी, कलाविद्याप्रेमी असा हा माणूस टाटा घराण्याला ललामभूत ठरला आहे.

टाटा उद्योगसमूह हा १९५० पासून भारतातील सर्वांत मोठा उद्योगसमूह म्हणून गणला जाऊ लागला. या समूहात कापड–वस्त्रे, पोलाद व वीज, कृषिअवजारे व सामग्री, रेल्वेडबे व एंजिने, डिझेल ट्रक व अन्य अवजड सामग्री, रसायने, सिमेंट, खाद्यतेले, साबण व प्रसाधनवस्तू, मनोरंजनात्मक व इलेक्ट्रॉनीय उपकरणे इ. विविध प्रकारचे उत्पादन होत असते. ह्यांशिवाय पर्यटन उद्योग, हॉटेल उद्योग व विमाव्यवसाय ह्यांमध्येही टाटांची यशस्वी वाटचाल आहे. टाटा उद्योगसमूहाची रूपरेषा तसेच टाटा न्यासांच्या विविधांगी समाजोपयोगी कार्याचे स्वरूप रतन टाटा यांच्या ९ ऑक्टोबर ला निधनाने जगभरात पुन्हा पुन्हा चर्चेत आले.ज्यांचा जन्म कुठे? कधी?. कसा झाला ?. यांची माहिती नसलेल्या देवा देवीची म्हणती सांगण्यास मनुवादी प्रिंट चॅनल मीडिया थांबत नाही. विविध मालिकेतून आधुनिक तंत्रज्ञान वापरुन चमत्कार दाखविला जातो. पण सत्य दाखविल्या जात नाही त्यावर चर्चा होत नाही.त्यामुळेच बहुसंख्य समाज बांधव रीतिरिवाज परंपरा पार पाडतांना दिसतात.त्यात अशिक्षिता पेक्षा उच्च शिक्षित डॉक्टर,इंजिनियर,कॉम्प्युटर हाडवेअर सापटवेअर इंजिनियर मागे नाहीत.हेच मोठी शोकांतिका आहे.

टाटा कंपनीने आधुनिक तंत्रज्ञान वापरुन किती किती शोध लावले त्यावर सर्वसामान्य लोकांना माहिती सांगितली पाहिजे. त्यावर भर दिला जात नाही. पाण्यापासून वीज कशी निर्माण केली जाते. किती लोक सांगू शकतील?.फेब्रुवारी १९१५ पासून लोणावळा, वळवण,शिरोटा,ठोकरवाडी व मुळशी या पाच ठिकाणी असलेल्या धरणांच्या पाण्याचा उपयोग करून खोपोली,भिवपुरी व भिरा येथील वीजउत्पादन केंद्रे मुंबईला विजेचा पुरवठा करत होती.शाळेच्या माध्यमिक अभ्यास क्रमात त्यांची माहिती आहे.

भिरा पंप केलेले स्टोरेज युनिट हे भारतातील असे एकमेव सर्वात मोठे युनिट आहे आणि कदाचित भारतात पंपिंग आणि जनरेशन या दोन्ही मोडमध्ये कार्यरत असलेले एकमेव पंप केलेले स्टोरेज युनिट आहे.त्याच भिरा प्रकल्पावर मी १९९७ ला काम केले. १५ ऑगस्ट १९९७ ला पाईप लाईन फुटून मोठा अपघात झाला होता. हजारो गावे वाहून गेले होते.आशिया खंडातील पहिला प्रकल्प जो मुळशी धरणेचे पाणी खाली आणून वीज तयार करते.ते खालच्या धरणात पाणी गोळा होते. नंतर रात्री तेच पाणी वरच्या धरणात जाते.या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली पाहिजे.विज्ञानाने झपाट्याने प्रगती करीत असतांना आम्हाला रितीरिवाजने परंपरेने लक्ष्मी पूजनाचे महत्व विविध मार्गाने समजावून सांगितल्या जाते.त्यात ही ब्राह्मण बनीयचा धंदा डोळ्यासमोर ठेऊन ग्राहकांना आकर्षित केल्या जाते.मी टाटा कंपनीत काम करीत असतांना टाटाने कधी लक्ष्मी पूजन केल्याचा पुरावा मिळत नाही. म्हणूनच टाटा ग्रुप कंपनीचे संस्थापक जमशेटजी टाटा ते रतन नवल टाटा (२८ डिसेंबर १९३७ ते ९ ऑक्टोबर २०२४) हे एक भारतीय उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष होते. देशभक्ती व सामाजिक बांधिलकी यात देशात त्याची कोणीच बराबरी करू शकत नाही. टाटा चॅरिटेबल ट्रस्टचे नेतृत्व ते करीत होते.भारतातील दोन सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मभूषण (२०००) आणि पद्मविभूषण २००८ ला मिळाला होता.हा इतिहास लक्षवेधी आणि प्रेरणादायी तो तरुणांनी डोळ्यासमोर ठेऊन स्वताची आणि देशाची प्रगती केली पाहिजे.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.**
**टाटा पॉवर कंपनी सेवा निवृत कर्मचारी.**

# विकास काय असतो हे मी पाच वर्षात दाखवून दिले आहे, त्यावर आटोळे बांधणाऱ्यांनी बोलू नये - आ अभिमन्यू पवार यांची विरोधकांवर टीका..

औसा – ज्यांनी दहा वर्ष आमदार म्हणून काम केले त्यांनी औशाच्या जनतेसाठी कधी विधीमंडळात आवाज उठवला आहे का? मतदारसंघातील जनतेचे प्रश्र्न मांडून ते सोडविण्याचे काम त्यांनी केले आहे का? केवळ आटोळे बांधून मतदारसंघाचा विकास होत नाही त्यासाठी सरकारकडे पेहरवी करून मतदारसंघाच्या विकासासाठी निधी खेचून आणावा लागतो आणि ते काम मी या पाच वर्षांत करून दाखवले आहे. तीन हजार कोटीपेक्षा अधिक निधीतून मतदारसंघात केलेल्या कामातून जनतेचे प्रश्र्न विधीमंडळाच्या माध्यमातून सोडवून विकास काय असतो ते मी दाखवून दिले आहे. त्यावर आटोळे बांधणाऱ्यांला बोलायचा अधिकार नसल्याची टीका आमदार अभिमन्यू पवार यांनी विरोधकांवर केली आहे.



औसा मतदारसंघात (दि.३०) ऑक्टोबर रोजी भुसणी, शिवणी बु., तोंडोळी, कवठा व होळी येथे आयोजित कॉर्नर बैठकीत ते बोलत होते. ते पुढे बोलत होते की जनतेमध्ये जावून जनतेचे प्रश्र्न जाणून घेऊन ते सोडविण्याचे प्रामाणिक काम मी या पाच वर्षांत केले आहे. जनतेसाठी मी पाच वर्ष झिजलो आहे. काम करताना कधी कोणाची जात, पात व धर्म बघितले नाही. कोणत्या ग्रामपंचायतीचा सरपंच कोणत्या पक्षाचा आहे. हे मी निधी देताना पाहिले नाही. मी जनतेची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. माझ्याकडे येणाऱ्या माणसाचे काम करण्याचा प्रयत्न सातत्याने करीत असताना जनतेच्या प्रश्र्नासाठी विधीमंडळात आवाज उठवला आहे. जनतेसाठी पुर्ण वेळ उपलब्ध राहून त्यांच्या कामासाठी मंत्रालयाच्या शेकडो फेऱ्या मारल्या आहेत. जनतेच्या सुखा दुः खात सहभागी राहिलो आहे. कोव्हीड च्या काळात लोकांच्या अडचणी जाणून घेत त्यांना मदतीचा हात दिला तर गोगलगाय प्रादुर्भावाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी विधीमंडळात आवाज उठवून कृषी मंत्र्यांना मतदारसंघात पाहणीसाठी येण्यास भाग पाडून मतदारसंघातील शेतकऱ्यांना शंभर कोटी रुपयांची मदत मिळवून दिली. आशा परिस्थितीत गेले पंधरा वर्ष कुठेही न दिसणारे माजी आमदार आज विकासाची भाषा बोलत आहेत. मतदारसंघातील प्रत्येक गावात आज विकासकामे पूर्ण होत असताना विकास काय असतो ते मी दाखवून दिले असल्याचा विश्र्वास यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार यांनी बोलून दाखविला. यावेळी राष्ट्रवादीचे बबन भोसले, लक्ष्मण पाटील, दिनेश महाराज माने, भैय्या पाटील, वीरभद्र स्वामी, श्रीमंत माने, उर्मिला मुक्तापुरे, किशोर जाधव, शुभम बुके, धीरज जाधव, विक्रम चव्हाण, योगेश सपाटे, कृष्णा साळुंके, शिवाजी सपाटे, कांतराव पाटील, नानासाहेब पाटील, मयुर भडके, दत्ता पाटील, किशोर पाटील, बळवंत जाधव, विकास हत्तरगे, शिवराज पाटील, ज्ञानेश्र्वर जाधव, गायत्री जाधव आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते..

# दिवाळीनिमित्त आमदार धिरज देशमुख यांनी घेतल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी

लातूर / प्रतिनिधी : लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी लातूर शहर, लातूर ग्रामीणसह जिल्ह्यातील नागरिक, स्नेही, विविध क्षेत्रातील मान्यवर, काँग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांची गुरुवारी, दि ३१ ऑक्टोबर रोजी बाभळगाव येथे भेट घेतली. तसेच, सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.



सर्वांना दिवाळी आनंद , सुखा – समाधानाची जावो, या शुभेच्छांसह सर्वांनी हरित दिवाळी साजरी करावी, असे आवाहन आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले. शेतकरी, महिला, बेरोजगारांचे प्रश्र्न सोडविण्यासाठी आणि महाराष्ट्राची अस्मिता जपण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व महाविकास आघाडीच्या मागे आशीर्वाद उभा कराल, असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विजय देशमुख , रविंद्र काळे , सुनील पडिले , अनंतराव देशमुख , संतोष देशमुख , उमाकांत खलंग्रे , शेषराव हाके , अनुप शेळके , संजय हरिदास , तुकाराम कोल्हे , सुनिता आरळीकर , बळवंत पाटील , सुरेश चव्हाण , प्रताप पाटील , मोईज शेख , शाम भोसले , प्रमोद जाधव , प्रभाकर केंद्रे , रविंद्र काळे , गोविंद बोराडे , मदन भिसे , मोहन शिरसाठ , जितेंद्र स्वामी , राम स्वामी , सुभाष घोडके , प्रदीप राठोड , कैलास पाटील , राजकुमार पाटील , सचिन दाताळ , विश्र्वासराव देशमुख , युवराज जाधव , माणिक सोमवंशी , नागनाथ कराड , अशोक राठोड , मनोज पाटील , श्रीनिवास शेळके , गुरुनाथ गवळी , तुकाराम गोडसे , सुधाकर गवळी उपस्थित होते. तसेच सुरेश लहाने , दिलीप गोटके , रमेश सोनवणे , दिलीप माने , शाम देशमुख , मुंडे , एकनाथ पाटील , बालाजी बिराजदार , प्रेमनाथ आकनगिरे , सचिन सूर्यवंशी , गणेश देशमुख , संभाजी रेड्डी , हरिभाऊ गोडभरले , आशादुल्ला सय्यद , पाशामिया शेख , महेंद्र भादेकर, संजय चव्हाण , प्रवीण सूर्यवंशी , वाल्मिक माडे , राजेसाहेब सवई , आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## खरी रमापूजा ..

बंदिस्त तिजोरी पूजा
लक्ष्मी माता हो खिन्न
विनियोग संचीत धन
रमा होणार सु प्रसन्न

भरल्यापोटी अन्नदान
दाखवा अल्पसौजन्य
बरसता धारा पहाव्या
भेदभाव न करेपर्जन्य

दिल्याने होतआहे अरे
भरभरुनवाढेल उत्पन्न
आपल्यासहित शेजार
रे बनावा समृध्द संपन्न

वाटून खाता शीतशीत
चवदारअधिक ते अन्न
बिथरेल अंधार सुध्दा
विनाशेलकाळाकभिन्न

एकट्याने करताजेवण
स्वादिष्ट घास रे कदान्न
रमेला प्रियतम मेहनत
सर्वांचेच असते गणान्न

संतुष्ट ना विष्णू लक्ष्मी
दावा भोज जरी छपन्न
होईलं संतुष्ट परो परी
भुकेल्या भरविता अन्न

अहंकारी होता दातृत्व
पुण्य होई छिन्नविछिन्न
कुबेर असून तिजोरीत
अठरा विश्र्वे जणू दैन्य

कृपणता नको काही
वृत्तीत असावे वदान्य
स्थिरावे लक्ष्मी ममत्वे
जिथे नसता मालिन्य

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

## निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसात कुमार यांनी घेतला लातूर ग्रामीण, लातूर शहर मतदारसंघातील विविध पथकांचा आढावा

लातूर, : विधानसभा सार्वत्रिक



निवडणुकीकरिता २३४- लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ आणि २३५- लातूर शहर विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून भारत निवडणूक आयोगाने काकराला प्रसांत कुमार यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात निवडणूक खर्च विषयक विविध पथकांचा आढावा घेतला.

निवडणूक निरीक्षकांचे समन्वय अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी आप्पासाहेब चाटे, निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाचे प्रमुख तथा जिल्हा परिषदेचे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजेंद्र नागणे, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार गणेश सरोदे, आदर्श आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी तथा लातूर शहर महानगरपालिकेचे सहायक आयुक्त डॉ. पंजाब खानसोळे, निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी तथा राज्यकर उपायुक्त ज्ञानोबा मुके यांच्यासह विविध पथकांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

उमेदवारांकडून होणाऱ्या निवडणूक खर्चावर संनियंत्रण करण्यामध्ये स्थिर निगराणी पथके (एसएसटी), भरारी पथके (एफएसटी), व्हिडीओ सर्व्हीलंस टीम (व्हीएसटी) यांची महत्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे या पथकामध्ये कार्यरत असलेल्या प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी. निःपक्षपातीपणे काम करून आपले कर्तव्य बजावावे. निवडणूक खर्चाच्या किंवा मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी रक्कम, मौल्यवान वस्तूंचे वाटप होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यास तत्काळ घटनास्थळी पोहचून आवश्यक कार्यवाही करावी, असे निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांनी संगितले. तसेच सभा, रॅली, बैठकामध्ये वापरलेले साहित्य व परवानगीत परवानगी दिलेल्या साहित्याचे बारकाईने नोंद घ्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

# तुम्हाला सुगर आटोक्यात आणायची आहे? मग 'या' healthy Drinks चे करा सेवन

सध्या उन्हाळा सुरू आहे त्यामुळे आपल्या आहारात आपल्या हेल्थी फूडसह हेल्थी ड्रिंक्सचाही समावेश करणं अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा आपण आपल्याला वेळ मिळेल त्याप्रमाणे कैरीचे पन्हे, कोकम सरबत, आवळा सरबत, नारळाचे पाणी, ताक किंवा उन्हाळ्याचे उपयुक्त ठरतात ते सर्व पदार्थ खाण्याचा-पिण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे आपल्यालाही आपल्या आरोग्यासाठी त्याचा चांगला फायदा होतो.

परंतु ऋतू कोणताही असो आपल्याला आपल्या आहारात आपल्या शरीरातील साखर कमी करण्यासाठीही तितकेच प्रयत्न हे करावे लागतात. तेव्हा उन्हाळ्यात जर का तुम्हाला तुमच्या शरीरातील साखर ही चांगली ठेवायची असेल तर तुम्ही या काही पेयांचा वापर करू घेऊ शकता.

या लेखातून आपण जाणून घेणार आहोत की जर का तुम्हाला शुगरचा त्रास असेल तर तुम्ही या पेयांचा आपल्या आहारात समावेश करून घेऊ शकता. उन्हाळ्यात आपल्याला जास्त तहान लागते परंतु तहान लागत असली तरी आपल्याला आपली तहानच फक्त भागवून फायद्याचे नाही तर आपल्याला आपल्या आरोग्याच्या दृष्टीनंही तशी पेय पिणं



आवश्यक आहे. ज्यातून आपल्या शरीरालाही चांगला फायदा होईल. आम्ही येथे फक्त ओआरएस किंवा ग्लुकोन-डी बद्दल बोलत नसून तुम्ही या पेयांचा आपल्या आहारात समावेश करून पाहा.

नारळाचे पाणी - नारळाचे पाणी हेही शुगर असणाऱ्यांसाठी फायदेशीर आहे. यातून तुम्हाला फायबर आणि पॉटेशियम हे गुणधर्म मिळतात. सोबतच तुमची साखरही कमी व्हायला मदत होते.

लिंबू पाणी - याचे सेवन केल्यानं तुमची साखर ही आटोक्यात राहते. यामध्ये मोठ्या प्रमाणात व्हिटॅमिन सी असते.

पालक ज्यूस - यामुळे साखरेचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. सोबतच यात प्रोटीन, आयरन, आणि व्हिटॅमिन सी असते.

कारल्याचे जूस - हे ज्यूस डायबेटिस पेशंटला फायेदशीर असते. यातमध्ये सेपॉनिन्स आणि टरपेनॉइड असतात.

धन्याच्या पावडरचे ज्यूस - या ज्यूसचे सेवन केल्यानंतरही तुम्हाला साखर कमी होण्यास फायदा होऊ शकतो.

# पीठ मळून झाल्यानंतर त्यावर तीन बोटांचा ठसा का काढतात? तुम्ही तर करत नाही ना 'ही' चूक?

आज घरात नवरा बायको एकमेकांना घरकामात मदत करतात. दोघेही संसाराचा गाडा एकत्र पुढे नेतात. घरातील कामाचा एक भाग असतो तो म्हणजे स्वयंपाक करणे. स्वयंपाक म्हटलं तर वरण भात, भाजीसोबत गरमा गरम चपाती किंवा रोटी केली जाते. चपाती किंवा रोटी करायची म्हटलं तर आधी पीठ मळलं जातं. पीठ मळून झाल्यानंतर खास करुन महिला त्यावर तीन बोटांचा ठसा काढतात. अगदी घरातील पुरुषाने कधी पीठ मळून दिल्यानंतरही त्या त्यांना आवर्जून त्यावर बोटांचे ठसे देण्यास सांगतात. तुम्ही ही गोष्ट अनेक वेळा पाहिली असेल. पण त्यामागील कारणाबद्दल कधी विचार केला का? प्रत्येक गोष्टीमागे कारण असतं. मग ते शास्त्रीय असो किंवा धार्मिक असो. पीठ मळून झाल्यानंतर बोटाच्या खुणा का दिल्या जातात या मागे काय कारण आहे याबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत.



पूर्वजांशी आहे त्याचा संबंध!

पिठावर बोटांचे ठसं देण्यामागे धार्मिक कारण असून त्याचा संबंध हा पिंडदानाशी जोडला गेला आहे. हिंदू धर्मात पूर्वजांच्या आत्म्याच्या शांतीसाठी पिंड दान करण्याचा विधी केला जातो. पिंडदान केल्याने पितरांना स्वर्गप्राप्ती मिळते, धर्मशास्त्रात मान्यता आहे. पिठ किंवा तांदळापासून बनवलेले पिंडाचा संबंध हा चंद्रांशी आहे, धर्मशास्त्रात सांगण्यात आले आहे. अशीही मान्यता आहे की, चंद्राद्वारे पिंड हे पितरांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे पिंडदानाच्या विधी वेळी खासकरुन तांदळ पिठापासून किंवा भातापासून पिंड तयार केले जातात.

...म्हणूनच आपण बोटांचे ठसे देतो

धार्मिकशास्त्रात पिठाचे गोळे हे पूर्वजांचं अन्न मानलं जातं. त्यामुळे जेव्हा आपण घरात चपाती किंवा रोटी खातो तेव्हा आपल्याला पाप लागतं अशी समज आहे. हे पाप टाळण्यासाठी पीठ मळून झाल्यानंतर त्यावर बोटांचे ठसे दिले जाते. यानंतर या पिठापासून तयार केलेली चपाती किंवा रोटी खाण्यायोग असते असं म्हणतात. म्हणून घरोघरी जेव्हा पीठापासून खास करुन तांदळाच्या पिठापासून जितके पदार्थ असतात त्यांचं पीठ मळताना त्यावर बोटाचे ठसे दिले जातात. म्हणजे ते पिंडदानाचे पीठ वाटणार नाही आणि तुम्हाला पाप लागणार नाही.

# महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव यांचा सेवा गौरव समारभ उत्साहात संपन्न

लातूर : महात्मा बसेश्र्वर महाविद्यालय, लातूर येथील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील उपप्राचार्य प्रा. बालाजी माधव जाधव हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवा गौरव सोहळा महाविद्यालयात संपन्न झाला.

यावेळी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव श्री. माधवराव पाटील टाकळीकर, कार्यकारी संचालक श्री. प्रदीपकुमार दिंडेगावे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, माजी उपप्राचार्य प्रा. बी. एस. पनूरे, माजी पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. अश्र्विनी रोडे, विशाल दिंडेगावे, सत्कारमूर्ती उपप्राचार्य प्रा. बालाजी माधवराव जाधव, सुनीता जाधव, संतोष जाधव, सुरज जाधव, कु. शितल जाधव यांची उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या प्रारंभी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि महिला पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

यानंतर श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर आणि कार्यकारी संचालक श्री. प्रदीपकुमार दिंडेगावे यांनी उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव यांचा शाल, पुष्पहार, पत्र आणि आहेर देऊन सहपरिवार सत्कार केला.

यावेळी कार्यकारी संचालक प्रदीप कुमार दिंडेगावे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, डॉ. दुष्यंत कटारे, माजी उपप्राचार्य प्रा. बी एस पनूरे, संतोष जाधव आणि नामदेव बेंदर्गे यांनी मनोगतातून पुढील आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या

या सेवा गौरव सोहळ्यामध्ये सत्काराला उत्तर देताना उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेतील सर्व सन्माननीय संस्था पदाधिकाऱ्यांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य प्राध्यापकावर एका विभागाचे जबाबदारी सोपविली आणि ती जबाबदारी मी माझ्या कर्तव्यनिष्ठ भावनेने तब्बल ३३ वर्ष पूर्ण करण्याचा प्रयत्न केला, आज माझ्या सेवा गौरव सोहळ्याला संस्थेचे सचिव आणि कार्यकारी संचालक, प्राचार्य, माजी प्राचार्य, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत याबद्दल माझ्या मनामध्ये आनंदाच्या भावना आहे असे सांगून यापुढेही या महाविद्यालयाला आवश्यकता असेल त्यावेळी सहकार्य करण्याचे आश्र्वासनही त्यांनी याप्रसंगी दिले

या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम हा व्यवसायाभिमुख असा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ३३ वर्ष अध्यापणाचे कार्य उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये केले आहे त्यांच्या कुटुंबामध्ये त्यांची दोन मुले, कन्या उच्चविद्याविभूषित असून त्यांना पुढील आयुष्य निरोगी. सुदृढ आणि आरोग्यदायी जावो अशी सदिच्छा ही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. संजय पवार, सूत्रसंचालन प्रा. व्यंकट दुडिले यांनी केले तर आभार प्रा. दयानंद टेंकाळे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मित्रमंडळी, प्रा. किसनाथ कुडके, रत्नेश्र्वर स्वामी, विनायक लोमटे, महादेव स्वामी, अनिल उस्तुरगे, कृष्णा बडगिरे, योगेश मोदी, बालाजी होनराव, शिवशंकर खुब्बा, शंकर कांबळे रंगनाथ लांडगे आणि कृष्णा कोळी यांनी परिश्रम घेतले.

## राशीभविष्य 01 नोव्हेंबर 2024

मेष : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
मनोधर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

वृषभ : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

मिथुन : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पश्चिम
केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. नवीन वस्तु विकत घेण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

कर्क : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

सिंह : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्ते बाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

कन्या : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व
आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. प्रिय व्यक्तिची भेट होण्याचे योग आहेत.

तुळ : शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :पश्चिम
जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील.

वृश्चिक : शुभ रंग :निळा,शुभ दिशा:पूर्व
उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल. जोखमीचे कामे शक्यतो आज करू नका.

धनु: शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. वाहन चालवतांना सावधानी बाळगा. आरोग्य चांगले राहील.

मकर : शुभ रंग:लाल,शुभ दिशा: दक्षिण
चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या. मान सन्मान मिळण्याचे योग आहेत.

कुंभ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा :पूर्व
आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

मीन : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

## इतिहासात आजचा दिवस 01 नोव्हेंबर 2024

अंतरराष्ट्रीय
१८५८ – व्हिकटोरिया राणीने संसदेच्या ठरावानुसार भारतातला ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपवून भारतावर ब्रिटिश अंमल सुरू केला.
१९१३ – डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे आणि पं. कांशिराम यांनी अमेरिकेत 'गदर' या नावाचे वृत्तपत्र सुरू केले.
१९५२ – पहिल्या हैड्रोजन बॉम्बची अमेरिकेने चाचणी केली.
२००६ – ब्रिटनमध्ये एका विद्यापीठाच्या वैज्ञानिकांनी मनुष्याचे एक छोटे कृत्रिम हृदय विकसित केले.
राष्ट्रीय
१८४५ – भारतातील पहिले वैद्यकीय महाविद्यालय 'ग्रँट मेडिकल कॉलेज' मुंबई येथे सुरू.
१८८१ – सिआल्दा ते बौबझार मार्गावर भारतातील पहिली ट्राम रूळावरून धावली.
१९५६ – भाषावार प्रांतरचना आस्तित्वात. द्वैभाषिक मुंबई राज्याची स्थापना.
१९६६ – पंजाबी भाषक पंजाब आणि हिंदी भाषक हरियानाची स्थापना.
१९६७ – आकाशवाणीने पुणे, मुंबई, नागपूरहून विविध भारतीवर जाहिरात प्रसारण सुरू केले.
जन्म
१७६२ – स्पेंसर पर्सिव्हाल, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१७७८ – गुस्ताफ चौथा एडॉल्फ, स्वीडनचा राजा.
१८६५ – मॉटी बाउडेन, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९२१ – शरद तळवलकर, सुप्रसिद्ध मराठी अभिनेते.
१९२३ – ब्रुस डूलँड, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
१९२६ – जेराल्ड स्मिथसन, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९४० – रमेश चंद्र लाहोटी, भारताचे सर्वोच्च न्यायाधीश.
१९५१ – क्रेग सर्जियन्ट, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
१९६४ – कोसला कुरुप्पुअराच्छी, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.
१९६८ – अक्रम खान, बांगलादेशचा क्रिकेट खेळाडू.
१९७० – शर्विन कॅम्पबेल, वेस्टइंडीझचा क्रिकेट खेळाडू.
१९७३ – ऐश्वर्या राय, भारतीय अभिनेत्री.
१९७४ – व्ही.व्ही.एस. लक्ष्मण, भारतीय क्रिकेट खेळाडू.
निधन
१३९१ – आमाद्युस सातवा, सव्हॉयचा राजा.
१७०० – कार्लोस दुसरा, स्पेनचा राजा.
१८९४ – अलेक्झांडर तिसरा, रशियाचा झार.

# महायुतीचेच सरकार येणार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्र्वास

**(पान २ वरुन)** ..महापालिका ज्यांनी कार्यकर्तृत्वाच्या बळावर गाजवली असे काँग्रेसचे मातब्बर नेते रवी राजा यांनी भाजपामध्ये प्रवेश केला ही अतिशय आनंदाची बाब आहे. २३ वर्षे बेस्ट चे सदस्य म्हणून प्रभावी कामगीरी राजा यांनी बजावली होती. त्यांचा अनुभव, दांडगा जनसंपर्क याचा भारतीय जनता पार्टीला निश्र्चितच फायदा होणार आहे. राजा यांच्या संपर्कामुळे आगामी काळात काँग्रेसचे अनेक प्रमुख नेते भाजपामध्ये प्रवेश करतील असेही श्री.फडणवीस यांनी सांगितले. उबाठा चे उपविभागप्रमुख श्री.दरेकर यांच्या प्रवेशामुळे भाजपाची घाटकोपर मधील ताकद वाढणार असून त्याचा तेथील उमेदवारांना फायदा होईल असेही त्यांनी नमूद केले. मुंबई महानगरपालिकेतील जुने स्नेही आणि काँग्रेसचे अभ्यासू नेतृत्व अशी ख्याती असलेल्या राजा यांच्या भाजपा प्रवेशाने सायन कोळीवाडा परिसरात आणि बाबू दरेकर यांच्या प्रवेशामुळे घाटकोपर परिसरात भाजपाची ताकद वाढेल असे श्री. शेलार म्हणाले. काँग्रेस ने आपल्या अनुभवाचा फायदा करून घेतला नाही. आपण कोणत्याही पदाच्या अपेक्षेने भाजपामध्ये आलो नाही. यापुढे भाजपा ची ताकद वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे श्री. राजा यांनी सांगितले.

युवक काँग्रेस माजी प्रदेश उपाध्यक्ष अभिषेक सावंत, आशीष राठी, सर्वन्ना रंगस्वामी, आर. के. यादव, सुनील वाघमारे, तबस्सुम शेख या काँग्रेसच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

**गोपाळ शेट्टी यांची समजूत काढू**

ज्येष्ठ नेते गोपाळ शेट्टी यांची समजूत काढण्याचे प्रयत्न चालू असून त्यात आम्हाला यश येईल, असा विश्र्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. काही ठिकाणी महायुतीतील कार्यकर्त्यांनी परस्परांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तर काही ठिकाणी पक्षांतर्गत बंडखोरी झाली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत बैठक झाली असून एकमेकांच्या विरोधातील उमेदवार मागे घेण्यात यश मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894